महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०२/२०१७

**१) घराचा समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन टिनाचे पेटीतुन सोन्याची चोरी . :–**

दिनांक २१/०२/२०१७ चे १७.०० ते २२/०२/२०१७ चे ०७.२० वा. दरम्यान यातील फिर्यादी आपले आईला सोबत घेवुन मुलीचे सुतकाचे कार्यक्रमा करीता सिंगोरी येथे घराचे समोरील दाराचा व वाल कंम्पाऊन्डच्या गेटला ताला लावुन गेला व दिनांक २२/०२/२०१७ चे ०७.२० वा. घरी परत आला असता समोरील गेट व दाराचा ताला तोडलेला दिसला घरात प्रवेश करुन पाहीले असता कोणीतरी अज्ञात चोराने गेटचा व घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरात असलेल्या टिनाचे पेटीमधुन १ सोन्याचे मंगळसुत्र अंदाजे ३ तोळे, २ सोन्याचे गोप २ तोळे, ४ सोन्याच्या अंगठया २० ग्रॅम, २ सोन्याचे कानातील झुमके ०३ ग्रॅम, १ सोन्याची नथ ०४ ग्रॅम, असा एकुण १,५,०००/–रु. माल सुना मौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादी संजय महादेव उके वय ४१ वर्ष, रा. आदर्श नगर लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**२) घराचा दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन सामानाची व पैश्याची चोरी. :–**

दिनांक २१+२२/०२/२०१७ चे रात्र. दरम्यान. यातील फिर्यादी हे घराला कुलुप लावुन बाहेर गावी कामानिमीत्त गेला असता कोणीरती अज्ञात चोराने सुना मौका पाहुण घराचे समोरील दाराची पाटी काढुन कुलुप तोडुन आत प्रवेश करुन घरातील एक सोनी कंपनीचा एलसीडी टिव्ही व आलमारीत ठेवलेली १ काळया मण्याची पोत जामध्ये सोन्याचा डोरला, २ मोठे मणी व लहान मणी सोन्याचे वनज २ ग्रॅम व नगदी २,०००/–रु. असा एकुण ३७,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी सुखदेव विठोबाजी नरोले वय ५२ वर्ष, रा. शेषनगर पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५७,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) गैरकायदयाची मंडळी जमवुन जागेचे हिस्सेवाटणी वरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिली . :–**

दिनांक २१/०२/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी रवीद्र सुधाकर मेहर वय ४३ वर्ष, रा. शास्त्री वार्ड गणेशपुर भंडारा व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असुन त्याच्या वडीलोपार्जीत जागेचे हिस्सेवाटणी वरुन वाद असुन यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीचे घरासमोर गाडी उभी करुन येणाऱ्या जाणाऱ्या रोडवर अडथळा निर्माण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी देवुन फिर्यादीचे पाटीवर थापड बुक्याने मारल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३४१,१४१,२९४,५०६,३२३, भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) घराचा दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक २२/०२/२०१७ चे १३.४५ ते १५.१५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी हा आपले घराचे समोरील दाराला ताला लावुन बाहेर गेला असता कोणीरती अज्ञात चोराने सुना मौका पाहुण घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन दिवान पलगांचे ड्रावरमध्ये ठेवलेला सोन्याचा गोप १२ ग्रॅम, सोन्याची अंगठी ०४ ग्रॅम, सोन्याचे टॉप्स ०३ ग्रॅम, सोन्याची गहू मणी गरसुली ज्यात १० मणी, १ डोरला १० ग्रॅम, व नगदी २०,०००/–रु. असा एकुण ७२,०००/–रु. चा माल चोररुन नेल्याने फिर्यादी आकाश सर्वोत्तम शहारे वय २५ वर्ष, रा. दवडीपार बाजार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५४,३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २२/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, मोहाडी, करडी, तुमसर, लाखणी येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५३ लिटर हातभट्टी दारु किंमती ४,२८०/–रु. व जुगारातुन किंमती ४,५८३ /–रु. असा एकुण ८,८६३/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

सपोनि.टी.एस.कोंयडे
नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९७७३२८२१००

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.